**नियमीत दिवाणी दावा क्र. ६१/२०१२**
**राज व इतर वि. अरविंद व इतर**

## <u>निशाणी क्र. ९२ कडील आदेश</u>

प्रस्तूतचा अर्ज साक्षीदार यांनी दाव्याची साक्षांकीत प्रत मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादीने आपले म्हणणे दाखल करुन साक्षीदाराचा दाव्याच्या मुद्याशी संबंध नसून तो दाव्यात पक्षकार नाही. त्यामुळे त्याला वादपत्राची प्रत देणे आवश्यक नाही. या कारणास्तव प्रस्तूतचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी मागणी केली आहे. वादी तर्फे विद्वान वकील श्री. आर. व्ही. वैशंपायन यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तूतचा साक्षीदार हा वादीद्वारे निशाणी क्र. ६४ कडील अर्जानुसार तपासण्यात येणार साक्षीदार आहे. सदर साक्षीदार दाव्यात पक्षकार नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराच्या मागणी प्रमाणे त्याला वादपत्राची झेरॉक्स प्रत न्यायाच्या दृष्टीने दिली गेल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही या मतास मी पोहोचलो आहे. करीता मी खालील आदेश पारीत करतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. वादीने साक्षीदारास वादपत्राची झेरॉक्स प्रत पुढील तारखेपर्यंत पुरवावी.
(खुल्या न्यायालयात जाहिर)

SANDEEP G SARODE
Digitally signed by SANDEEP G SARODE
Date: 2023.01.13 15:40:51 +0530

मुरुड (सं. गं. सरोदे)
दिनांकः १३/०१/२०२३ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मुरुड